ePaper

# इटलीच्या पंतप्रधान मेलोनी यांच्या सुंदरतेवर डोनाल्ड ट्रम्प फिदा

| वर्ष - 9 | अंक -52 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™



## आतील पानांत

- SIX मारण्याच्या प्रयत्नात जैस्वाल बाद
- सामना जिंकला, पण जीव गमावला!
- महाबळेश्वर स्ट्रॉबेरीस अतिवृष्टीचा फटका
- शिंदेंनी सुरू केलेल्या योजना बंद केल्या?

www.mahaenews.com | मंगळवार, दि. 14 ऑक्टोबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका: युतीबाबत CM फडणवीसांचे महत्त्वाचे विधान

# कुणीही कुणासोबत युती करू शकतं!

### “जिथे शक्य तिथे महायुती म्हणून लढणार, निर्णय स्थानिक नेतृत्वाच्या हाती”–देवेंद्र फडणवीस

| मुंबई | प्रतिनिधी |
महाईन्यूज

**राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापू लागले आहे. सर्वच पक्षांनी रणशिंग फुंकले असून, भाजपकडूनही मोठ्या प्रमाणावर संघटनात्मक हालचाली सुरू आहेत. राज्याचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस सध्या राज्यभर दौऱ्यावर असून, ते विविध जिल्ह्यांमध्ये पक्ष कार्यकर्त्यांशी संवाद साधत, निवडणुकीची तयारी तपासत आहेत. या पार्श्वभूमीवर त्यांनी युतीच्या राजकारणाबाबत दिलेलं विधान सध्या चर्चेचा विषय ठरत आहे.**

फडणवीस म्हणाले — “कुणीही कुणासोबत जाऊ शकतं, पण शेवटी सत्तेवर भाजप आणि महायुतीच येणार.” त्यांच्या या वक्तव्याने आगामी निवडणुकीच्या युतीच्या समीकरणांवर नवा वेध लागला आहे.

**जिथे शक्य तिथे महायुती म्हणून लढणार — फडणवीस**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या



निवडणुकीबाबत बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, “जिथे शक्य तिथे आम्ही महायुती म्हणून लढणार आहोत. मात्र, युतीचा निर्णय स्थानिक नेतृत्वावर सोपवला आहे. कारण प्रत्येक जिल्ह्याचं राजकीय गणित वेगळं असतं. त्यामुळे स्थानिक पातळीवरील कार्यकर्ते आणि नेतेच सर्वोत्तम निर्णय घेऊ शकतात. आम्ही त्यांचा निर्णय मान्य करू.”

फडणवीस पुढे म्हणाले, “युती झाली नाही तरी मित्र पक्षांविषयी टीका केली जाणार नाही. आम्ही परस्पर सन्मान राखून मैत्रीपूर्ण लढत लढू. कार्यकर्त्यांनी याबाबत तयारी दाखवली असून सर्वत्र सकारात्मक वातावरण दिसत आहे.” राज्यातील बहुतेक ठिकाणी भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्या एकत्रित प्रयत्नांतून महायुती मजबूत होत असल्याचा दावा फडणवीस यांनी केला. त्यांनी सांगितले की, “महायुतीने केलेली विकासाची कामं जनतेसमोर आहेत. त्यामुळे या निवडणुकीत मतदार पुन्हा एकदा आमच्या बाजूने मतदान करणार, असा आम्हाला विश्वास आहे.”

## राज्यात निवडणूक मोहीम वेगाने

फडणवीस सध्या राज्यभर दौरा करत असून, प्रत्येक जिल्ह्यातील कार्यकर्त्यांशी बैठक घेत आहेत. त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी बूथ स्तरावरील तयारी, प्रचार आराखडा आणि मतदार संपर्क कार्यक्रम यांची माहिती घेतली. भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये निवडणूक जिंकण्याचा आत्मविश्वास दिसून येत असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. “आम्ही केवळ राजकारणासाठी नाही, तर जनतेच्या विकासासाठी काम करतो. लोकांना स्थिर, निर्णायक आणि जबाबदार सरकार हवं आहे. हे सरकार महायुतीचं असणार, यात शंका नाही,” असे फडणवीस म्हणाले. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या “कुणीही कुणासोबत जाऊ शकतं” या विधानातून एकीकडे त्यांनी राजकीय शक्यतांना खुलं ठेवत, दुसरीकडे भाजप आणि महायुतीवरचा जनतेचा विश्वास अधोरेखित केला आहे. स्थानिक नेतृत्वाला दिलेल्या निर्णयस्वातंत्र्यामुळे पक्षातील कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. राज्याच्या राजकीय पटावर येत्या काही महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमुळे रंगतदार घडामोडी पाहायला मिळणार हे नक्की. मात्र, फडणवीसांच्या आत्मविश्वासपूर्ण भूमिकेमुळे महायुतीची निवडणूक तयारी सध्या सर्वाधिक चर्चेत आहे.

**कुणीही कुणासोबत जाऊ शकतं – पण जनता**

**महायुतीलाच निवडेल**

फडणवीस यांना विचारण्यात आलं की, मनसे आगामी निवडणुकीत महाविकास आघाडीसोबत जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे. यावर ते म्हणाले, “राजकारणात कुणीही कुणासोबत जाऊ शकतं, हे नवीन नाही. पण शेवटी जनतेचा कौल महत्त्वाचा असतो. काहीही झालं तरी महाराष्ट्रात भाजप आणि महायुतीचं सरकारच परत सत्तेवर येणार आहे.” ते पुढे म्हणाले, “आमच्या पक्षातील कार्यकर्त्यांमध्ये आणि नेत्यांमध्ये प्रचंड उत्साह आहे. स्थानिक निवडणुका म्हणजे कार्यकर्त्यांची खरी परीक्षा असते. मागील काही वर्षांत महायुती सरकारने घेतलेले निर्णय, राबवलेल्या योजना आणि विकासाचा वेग पाहता जनता आमच्यावर विश्वास दाखवेल.

- “जिथे शक्य तिथे महायुती म्हणून लढणार” – CM फडणवीस
- “कुणीही कुणासोबत जाऊ शकतं, पण जनता महायुतीलाच निवडेल”
- “कोणतीही योजना बंद होणार नाही, विकास सुरूच राहील”
- स्थानिक नेतृत्वाला दिला युतीचा निर्णय अधिकार

**युतीचा निर्णय स्थानिक नेतृत्वावर सोपवला**

फडणवीस यांनी स्पष्ट केलं की, युतीचा निर्णय आता “वरून लादला” जाणार नाही. “प्रत्येक जिल्हा, प्रत्येक तालुका, प्रत्येक मतदारसंघाचं आपलं स्वतंत्र समीकरण असतं. तिथल्या कार्यकर्त्यांना आणि स्थानिक नेतृत्वाला परिस्थितीची जाणीव असते. त्यामुळे आम्ही युतीसंबंधीचे अधिकार त्यांनाच दिले आहेत. ते जो निर्णय घेतील, तो आम्हाला मान्य असेल,” असे फडणवीस म्हणाले. या वक्तव्यातून भाजपने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत विकेंद्रित निर्णयप्रक्रियेचा अवलंब करण्याचा निर्णय घेतल्याचे स्पष्ट दिसते.

**कोणतीही योजना बंद होणार नाही — फडणवीस**

शिवसेना (उद्धव ठाकरे गट) चे नेते अंबादास दानवे यांनी अलीकडे केलेल्या वक्तव्यात म्हटलं होतं की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या काही योजना बंद करण्यात आल्या आहेत. या आरोपाला फडणवीसांनी थेट उत्तर दिलं. “अंबादासजींना शिंदे साहेबांबद्दल चांगलं ट्वीट करण्याची इच्छा झाली, हेच महत्त्वाचं आहे,” असा टोला त्यांनी लगावला. “आम्ही कोणतीही योजना बंद केलेली नाही. राज्य सरकार सर्वच योजना चालू ठेवणार आहे. काही योजनांमध्ये प्रशासनिक प्रक्रियेमुळे थोडा विलंब होऊ शकतो, कोणतीही योजना बंद होणार नाही. विकासाचे काम अखंड सुरू राहतील,” असे त्यांनी स्पष्ट केले.

**७३ गटांसाठीचे आरक्षण जाहीर**

## मागासवर्गीय प्रवर्गासाठी १९ गट राखीव


# जिल्हा परिषदेच्या निवडणुकीचे बिगुल!

## सर्वसाधारणसाठी ४२ गट राखीव

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी ७३ गटांची आरक्षण सोडत सोमवारी जाहीर करण्यात आली. या सोडतीनुसार अनुसूचित जातींसाठी सात, अनुसूचित जमातींसाठी पाच आणि नागरिकांचा मागासवर्गीय प्रवर्गासाठी १९ असे गट राखीव झाले आहेत. त्यापैकी दहा जागा महिलांसाठी राखीव झाल्या आहेत. दरम्यान, आरक्षणाचा फटका काही मोठ्या नेत्यांना बसणार असून त्यांना अन्य पर्याय शोधावा लागणार असल्याचे सोडतीनंतर स्पष्ट झाले.**



जिल्हा परिषदेच्या गटांसाठीची आरक्षण सोडत जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली काढण्यात आली. उपजिल्हाधिकारी चारुशीला मोहिते-देशमुख, कुळ कायदा शाखेचे तहसीलदार जगदीश निंबाळकर, निवडणूक शाखेचे तहसीलदार राहुल सारंग यावेळी उपस्थित होते. हवेली तालुक्यातील गाऊडदरा जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या हस्ते चिठ्ठ्या काढून आरक्षणाची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. आरक्षणानुसार सर्वसाधारण प्रवर्गासाठी ४२ गट राखीव झाले असून त्यापैकी २० गट महिलांसाठी राखीव आहेत. एकूण ७३ गटांपैकी ३७ गट महिलांसाठी राखीव झाले असून त्यामध्ये अनुसूचित जाती सात गट असून त्यापैकी चार गट महिलांसाठी, अनुसूचित जमातींसाठी पाच गट असून त्यापैकी तीन गट महिलांसाठी तर नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी १९ गट राखीव झाले असून त्यापैकी दहा गट महिलांसाठी आरक्षित झाले आहेत.नवीन आरक्षण पद्धतीनुसार अनुसूचित जाती आणि जमाती यांचे आरक्षण हे जिल्ह्यातील गटांमध्ये सर्वाधिक लोकसंख्येच्या गटापासून उतरत्या क्रमाने काढणे अपेक्षित आहे. मात्र, अनुसूचित जाती गटाचे आरक्षण काढताना हवेली तालुक्यातील लोणीकाळभोर गटाऐवजी इंदापूर तालुक्यातील भिगवण गट आरक्षित असल्याचे सांगण्यात आले. उरुळी देवाची येथील देवा गायकवाड या नागरिकाने भिगवण गटातील अनुसूचित जातीची लोकसंख्या लोणीकाळभोरपेक्षा कमी असल्याची बाब जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर निवडणूक शाखेची चूक झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर अनुसूचित जाती प्रवर्गासाठी भिगवण ऐवजी लोणीकाळभोर गटाची सोडत काढण्यात आली.

## मागासर्वग प्रवर्गासाठी १९ गट

उपजिल्हाधिकारी चारुशीला मोहिते-देशमुख, कुळ कायदा शाखेचे तहसीलदार जगदीश निंबाळकर, निवडणूक शाखेचे तहसीलदार राहुल सारंग यावेळी उपस्थित होते. हवेली तालुक्यातील गाऊडदरा जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांचा हस्ते चिठ्ठ्या काढून आरक्षणाची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. आरक्षणानुसार सर्वसाधारण प्रवर्गासाठी ४२ गट राखीव झाले असून त्यापैकी २० गट महिलांसाठी राखीव आहेत.

इंदापूर – ७१ लासुर्णे -इंदापूर – ७० वालचंदनगर -बारामती – ६१ गुणवडी -हवेली – ४१ लोणीकाळभोरबारामती- ६५ निरावागज -दौंड -४५ गोपाळवाडी – हवेली- ३९ उरुळीकांचन-जुन्नर – ८ बारव -जुन्नर – १ डिंगोरे -आंबेगाव – ९ शिनोली-खेड- २१ वाडा -मावळ- २९ टाकवे बुद्रूकखेड – २२ कडुस -बारामती – ६० सुपा -हवेली – ४० थेऊर -शिरूर – १५ न्हावराजुन्नर – ४ राजुरी -जुन्नर – ६ नारायणगांव -जुन्नर – २ ओतूर -पुरंदर – ५३ नीरा शिवतक्रार -जुन्नर – ५ बोरी बुद्रूक -इंदापूर – ६७ पळसदेव-हवेली – ३७ पेरणे- -वेल्हे – ५५ वेल्हे बुद्रूक -खेड – २५ मेदनकरवाडी -मुळशी – ३६ पिरंगुट -.शिरूर – २० मांडवगण फराटा -दौंड – ४९ यवत -आंबेगाव – १३ अवसरी बुद्रूक -भोर – ५६ वेळू -मुळशी- ३४ पौड-खेड – २३ रेटवडी -दौंड – ४७ पाटस -बारामती – ६३ वडगाव निंबाळकर -शिरूर – १९ तळेगाव ढमढेरे -इंदापूर – ६९ निमगाव केतकी -मावळ – ३१ खडकाळे -आंबेगाव – ११ कळंब -दौंड – ४४ वरवंड -शिरूर – १८ शिक्रापूर आंबेगाव – १० घोडेगाव -मावळ – ३० इंदुरी -हवेली – ४२ खेड शिवापूर -खेड – २६ पाईट -इंदापूर – ६६ भिगवण -शिरूर – १६ रांजणगाव गणपतीजिल्हा परिषदेच्या गटांसाठीची आरक्षण सोडत जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली काढण्यात आली.

# पोषण आहार योजनेसाठी शाळांना अडचणी

## चार महिन्यांपासून इंधन, भाजीपाल्याचे अनुदान मिळालेले नाही

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यातील शाळांतील विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या पोषण आहार योजनेचा निधी शाळांना गेल्या चार महिन्यांपासून मिळालेला नाही. जूनमध्ये शाळा सुरू झाल्यापासून निधीच मिळालेला नसल्याने पोषण आहार योजनेसाठी शाळांना आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे शिक्षकांनाच पदरमोड करून पोषण आहार उपलब्ध करावा लागत असल्याची स्थिती निर्माण झाली आहे.**



पुढील चार दिवसांत शाळांना चार महिन्यांचा निधी एकत्रित वितरित केला जाणार असल्याचे स्पष्टीकरण शिक्षण विभागाने दिले.राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, शासकीय शाळा, अनुदानित शाळांतील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी पोषण आहार योजना राबवण्यात येते. त्यात पहिली ते पाचवी विद्यार्थ्यांसाठी ४५० उष्मांक, १२ ग्रॅम प्रथिनेयुक्त, तर पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी ७०० उष्मांक, २० ग्रॅम प्रथिनेयुक्त भोजन देण्यात येते. त्यासाठी शासननियुक्त पुरवठादाराकडून शाळांना तांदूळ, कडधान्ये, तेल, तिखट, मीठ, मसाला, मोहरी, जिरे अशा धान्य मालाचा पुरवठा केला जातो. ग्रामीण भागात स्वयंपाक्यांकडून आहार शिजवून घेऊन विद्यार्थ्यांना दिला जातो, शहरात केंद्रीय स्वयंपाकघरातून आहार पुरविण्यात येतो.महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे म्हणाले, 'पोषण आहार योजनेच्या अंमलबजावणीत प्रचंड बेफिकीरी आहे. योजनेचे कोणतेही अनुदान अग्रीम स्वरूपात दिले जात नाही. तसेच, दोन दोन-तीन महिने अनुदान मिळत नाही.

## अनुदान मिळालेले नाही

जूनमध्ये शाळा सुरू झाल्यापासून गेल्या चार महिन्यांपासून इंधन, भाजीपाल्याचे अनुदान मिळालेले नाही. त्यामुळे ग्रामीण भागात कोणताही बचत गट किंवा स्वयंपाकी या योजनेचे काम स्वीकारत नाही. शालेय पोषण आहार देण्याची जबाबदारी शाळा व्यवस्थापन समितीची आहे. ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांचे पालक हे शेतमजूर, कष्टकरी, गरीब कुटुंबातील असतात. हेच पालक शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी असतात. ते शालेय पोषण आहार योजनेमध्ये खर्चाचा हातभार उचलू शकत नाहीत.

जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञान | वाहतूक कोंडी फोडण्यासाठी

# डांगे चौक ‘ग्रेड सेपरेटर’ची लांबी वाढविणार!

## थेरगाव गावठाणात विनाअडथळा जाण्यासाठी महापालिकेचा प्रस्ताव

**पिंपरी चिंचवड ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**हिंजवडी आयटी पार्क ते पिंपरी चिंचवड शहराला जोडणाऱ्या डांगे चौक येथील ‘ग्रेड सेपरेटर’ अर्थात समतल विलगकाची लांबी वाढविण्यात येणार आहे. डांगे चौकातून थेरगाव गावठाणात जाण्यासाठी उजवीकडे वळताना येथे वाहतूक कोंडी होते. ती सोडविण्यासाठी या ‘ग्रेड सेपरेटर’चा विस्तार करण्यात येणार आहे.**




चिंचवड येथील बिर्ला रुग्णालयातून डांगे चौक, भूमकर चौक मार्गे हिंजवडी आयटी पार्ककडे जाणारा रस्ता हा शहरातील प्रमुख मार्ग आहे. दिवसभर मोठ्या प्रमाणात वाहतूक या मार्गावरून होते. डांगे चौकात होणारी वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी सात वर्षांपूर्वी महापालिकेने समतल विलगक तयार केला. या उपायामुळे चौकातील कोंडी काही प्रमाणात कमी झाली, मात्र थेरगाव गावठाणात जाणाऱ्या वाहनांसाठी अडथळा निर्माण झाला आहे..ही समस्या दूर करून थेरगाव गावठाणात जाणाऱ्या वाहनांसाठी विनाअडथळा मार्ग उपलब्ध करून देण्यासाठी समतल विलगकची लांबी वाढविण्याचा विचार महापालिकेकडून सुरू आहे. या कामासाठी वास्तुविशारद नेमण्याचा प्रस्ताव विचाराधीन असून, अधिकारी स्तरावर याबाबत हालचाली सुरू झाल्या आहेत.

### फुटपाथचे काम रखडणार

बिर्ला रुग्णालय ते डांगे चौक या मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूंना ‘अर्बन स्ट्रीट’अंतर्गत पदपथाचे काम सुरू आहे. मात्र, दहा महिने उलटूनही याचे केवळ ३० टक्के काम पूर्ण झाले आहे. दरम्यान, महापालिकेकडून डांगे चौकातील समतल विलगक (ग्रेडसेपरेटर) विस्तारीकरणाचा विचार सुरू झाल्याने पदपथाचे काम आणखी रखडण्याची शक्यता आहे. समतल विलगकाचे काम सुरू झाल्यास, त्याच्या बांधकामामुळे पदपथाच्या कामाला थेट अडथळा निर्माण होईल. विलगकाचे काम पूर्ण होईपर्यंत ‘अर्बन स्ट्रीट’ प्रकल्प पुढे नेता येणार नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. दरम्यान ‘स्टॉर्म वॉटर ड्रेनेज लाइन’ अर्थात पावसाळी वाहिनी टाकण्याचाही मोठा गुंता निर्माण झाला आहे. ही वाहिनी पदपथाला लागून चिंचवडकडे नेण्याचा विचार असून, तसे केल्यास आधीच तयार झालेला पदपथ पुन्हा खोदावा लागणार आहे. पर्यायी मार्ग म्हणून रस्त्यालगत असलेल्या पशुसंवर्धन विभागाच्या जागेतून वाहिनी टाकण्याचा पर्याय योजिला जात आहे. मात्र, त्यासाठी राज्य सरकारची परवानगी आवश्यक आहे. परवानगी न मिळाल्यास ही लाइन महापालिकेच्या जागेतूनच टाकावी लागेल, त्यामुळे पदपथाचे काम आणखी लांबण्याची शक्यता आहे.

> “ हिंजवडीकडे जाणाऱ्या वाहनांना थेरगाव गावठाणात प्रवेश करण्यासाठी डांगे चौक ओलांडून पुढे उजवीकडे वळावे लागते. दरम्यान, चिंचवडहून डांगे चौकाकडे जाणाऱ्या वाहनांच्या रांगा लागतात. त्यामुळे वळण घेताना समतल विलगकच्या तोंडावर वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. त्यामुळे डांगे चौकाकडून थेरगाव गावठाणात जाणाऱ्या वाहनांना विनाअडथळा मार्ग उपलब्ध करून देण्यासाठी समतल विलगकाची लांबी वाढविण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. महापालिकेच्या आयुक्तांच्या मान्यतेनंतर हा प्रस्ताव पुढे जाईल, आणि त्यानंतर वास्तूविशारद नेमण्याचे काम केले जाईल. वास्तूविशारद कामाचे स्वरूप ठरवून कामाची रचना आणि अंमलबजावणी ठरवतील.
>
> **-प्रमोद ओंभासे,** मुख्य अभियंता, पिंपरी-चिंचवड महापालिका.

# नाशिक महाकुंभची तयारी येत्या मार्चपर्यंत - आयुक्त सिंह

## रस्ते, सांडपाणी व्यवस्थापन, त्र्यंबकेश्वर कॉरिडॉर, दर्शनपथ, रामकुंड प्रकल्पांची कामे वेळेत पूर्ण करणार

**। पिंपरी चिंचवड ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**“पिंपरी चिंचवड| प्रतिनिधी: “नाशिक महाकुंभाची तयारी करण्यासाठी विविध प्रकल्प, विकास कामे सुरू आहेत. मार्च २०२६ पूर्वी सर्व कामे पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे,” अशी माहिती नाशिक महाकुंभ आयुक्त शेखर सिंह यांनी दिली.**



पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासकपदी तीन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर सिंह यांची नाशिक महाकुंभ आयुक्तपदी नियुक्ती झाली. त्यानिमित्त आयोजित एका सत्कार समारंभात ते बोलत होते. महाकुंभबाबत ते म्हणाले, “गेले दोन दिवस मी महाकुंभाच्या ठिकाणी होतो. एक दिवस नाशिक आणि दुसऱ्या दिवशी त्र्यंबकेश्वरला भेट देऊन पाहणी केली. नाशिकचा कुंभमेळा या दोन्ही ठिकाणी असतो. या पार्श्वभूमीवर सध्या दोन गोष्टींवर लक्ष दिले आहे. राज्य सरकारमार्फत रस्ते, सांडपाणी व्यवस्थापन, त्र्यंबकेश्वर कॉरिडॉर, दर्शनपथ, रामकुंड अशा प्रकल्पांची कामे वेळेत पूर्ण करणे आणि स्थानिक पातळीवर मार्च २०२६ पूर्वी सर्व तयारी करण्याचे उद्दिष्ट आहे.”प्रयागराज महाकुंभला भाविक मोठ्या संख्येने आले होते.

### ‘एआय’ तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर

नाशिक महाकुंभमध्ये तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वापर केला जाणार आहे. त्यामुळे गर्दीचे व्यवस्थापन व सेवासुविधा पुरविणे सोपे जाईल. सीसीटीव्ही कॅमेरे आणि ‘एआय’ तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. तंत्रज्ञानामुळे शेवटच्या घटकापर्यंत त्वरित पोहोचता येईल. याशिवाय जागतिक स्तरावर कुंभ पोहोचविण्यासाठी तंत्रज्ञानच उपयुक्त ठरेल, असेही सिंह यांनी नमूद केले. नाशिकचे सर्व अधिकारी चांगले मित्र आहेत. तरुण अधिकाऱ्यांशी चांगले संबंध आहेत. स्वतंत्र आयुक्त नियुक्त करणे ही मुख्यमंत्र्यांची संकल्पना आहे. कारण, जिल्हाधिकाऱ्यांना अनेक कामे असतात. त्यामुळे मला फक्त महाकुंभवरच लक्ष केंद्रीय करायचे आहे. भाविकांच्या श्रद्धेला धक्का लागणार नाही, याला प्राधान्य असेल. स्थानिक नागरिकांचे सहकार्य महत्त्वाचे ठरणार आहे. नाशिक महाकुंभची यशोगाथा आंतरराष्ट्रीय स्तरावर जाईल, असा विश्वासही सिंह यांनी व्यक्त केला.



**भूमिका**

# तरीही इस्रायल मोकळा सुटणार?

**इस्रायल आणि हमास यांच्यात आता होऊ घातलेल्या समझोत्यानंतर ‘गाझा पट्टी’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पॅलेस्टाईनच्या प्रदेशात शांतता नांदेल, असेही मानले जात आहे. ‘पॅलेस्टाईन’ला संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेतील दीडशेहून अधिक देशांनी मान्यता दिलेली आहे. ब्रिटन, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, फ्रान्स व पोर्तुगाल या पाच देशांनी अलीकडेच पॅलेस्टाईनला मान्यता दिली.**

यातून इस्रायलच्या वर्तनाबाबत जगातले अनेक देश समाधानी नाहीत हेही स्पष्ट झाले. हे असमाधान अर्थातच, ७ ऑक्टोबर २०२३ रोजी ‘हमास’ या अतिरेकी संघटनेने केलेल्या हल्ल्यात इस्रायलच्या १२०० नागरिकांना ठार करून २५० इस्रायलींना ओलीस ठेवल्यानंतर, इस्रायलने ‘हमास’ला धडा शिकवण्यासाठी सुरू केलेल्या सशस्त्र कारवाईचा रोख पॅलेस्टिनी महिला, मुले आणि मुख्यत: गाझा पट्टीतील वैद्यकीय सेवांविरुद्ध वळल्यामुळे उद्भवले आहे. वैद्यकीय सेवांवर पद्धतशीर, नियोजित बॉम्बफेक अथवा अन्य प्रकारचे हल्ले करण्यातून इस्रायलने आंतरराष्ट्रीय मानवतावादी कायद्याचा वारंवार भंग केलेला आहे. त्या तुलनेत, पॅलेस्टाईनच्या प्रतीकात्मकच उरलेल्या सार्वभौमत्वाला पाठिंबा देणे इतकीच कृती पुरेशी नाही. गाझातील नागरी वैद्यकीय सेवांचा जो संहार इस्रायलने गेल्या सुमारे दोन वर्षांत घडवला,



त्याबद्दलही जगाला ठाम भूमिका घ्यावी लागेल. तसे झाले नाही तर, पुढल्या काळातही केवळ इस्रायल-पॅलेस्टाईनच नव्हे तर जगातल्या कुठल्याही लष्करी संघर्षात नागरी वैद्यकीय सेवांवर घाला घातला जाण्याची शक्यता बळावेल.‘आंतरराष्ट्रीय मानवतावादी कायद्याचा भंग’ हा इथे पुरेसा स्पष्ट आहे. ‘नागरी वस्तीतील जखमी आणि आजारी, अशक्तपणा किंवा बाळंतपणासाठी आलेल्या रुग्णांच्या शुश्रूषेसाठी कार्यरत असलेली रुग्णालये कोणत्याही परिस्थितीत हल्ल्याचे लक्ष्य असू शकत नाहीत, संघर्षातील सर्व पक्षांकडून नेहमीच त्यांचा आदर आणि संरक्षण केले जाईल’ – असे सुस्पष्ट बंधन घालणारा ‘जीनिव्हा (अभिसंधी) समझोता क्र. ४’ हा इस्रायलनेही मान्य केलेला असून याच समझोत्यात पुढे, नागरी रुग्णांची ने-आण करणाऱ्या वाहनांचेही संरक्षण सर्व पक्षांनी केले पाहिजे, असेही बंधन आहे. प्रत्यक्षात हे नियम इस्रायलने पायदळी तुडवल्याचे गेल्या काही महिन्यांत दिसलेले आहे. गाझा आणि काही प्रमाणात पश्चिम किनारपट्टीच्या भागातही इस्रायलने नागरी रुग्णालयांवर वारंवार हल्ले केले. जागतिक आरोग्यविषयक स्थिती व घडामोडी यांची अभ्यासक तसेच आपत्कालीन वैद्यकीय सेवा विशेषज्ञ या नात्याने मी माझ्या काही सहकाऱ्यांसह या इस्रायली हल्ल्यांचा अभ्यास केला. या अभ्यासाचा एक भाग म्हणजे ७ ऑक्टोबर २०२३ ते ३० जून २०२४ या सुमारे पावणेनऊ महिन्यांच्या काळात ‘आरोग्य सेवा अथवा अशा सेवा देणाऱ्या वा घेणाऱ्यांवरील हल्ले’ म्हणून ज्या ८०० हल्ल्यांची नोंद झालेली आहे, त्यांच्या नकाशावरील स्थानांकांचे तसेच अन्य तपशिलांचे विश्लेषण. यातून असे आढळले की, यापैकी ५०.४ टक्के नोंदी आरोग्यसेवांच्या इमारतींची किंवा अन्य भौतिक सुविधांची हानी घडवल्याच्या होत्या, तर उरलेल्या ४९.६ टक्के नोंदी आरोग्यसेवा देणाऱ्यांवर (मग ते डॉक्टर असोत, वैद्यकीय कर्मचारी असोत की नोंदणीकृत आरोग्य कार्यकर्ते) हल्ला झाल्याच्या होत्या. गाझा शहरातील अल-शिफा हॉस्पिटल, खान यूनिस येथील नासेर हॉस्पिटल तसेच जबालिया येथील अल- अवदा हॉस्पिटल या मोठ्या आणि म्हणून तुलनेने सुरक्षित मानल्या जाणाऱ्या रुग्णालयांच्या परिसरांत सर्वाधिक हल्ले झाले. यानंतर ऑगस्टमध्येही नासेर हॉस्पिटलनजीक दुहेरी हल्ला (वरून आणि जमिनीवरून) झाला, त्यात तर पत्रकार आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांचेही बळी गेल्याचे जगाने (हल्ल्याचे ध्वनिचित्रमुद्रण समाजमाध्यमांवर व माध्यमांवर आल्यामुळे) पाहिले, मग इस्रायली पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांनी हा हल्ला म्हणजे एक ‘ दुर्दैवी अपघात’ होता, अशी प्रतिक्रिया दिली. हे हल्ले इतके वारंवार आणि सर्वदूर करण्यात आले की, त्यामुळे आता गाझात फार तर निम्मीच रुग्णालये रडतखडत का होईना, सुरू राहू शकलेली आहेत. इस्रायलने ४०५ पॅलेस्टिनी वैद्यकीय कर्मचाऱ्यांना बेकायदा बंदी बनवले आहे, त्यापैकी काही जणांचा छळ होत असल्याच्या तक्रारी आहेत

## प्रासंगिक »

### चिदम्बरमांची चिरचिर!

***‘ऑपरेशन ब्लू स्टार’ला ४० आणि मुंबईवरील ‘२६/११’च्या हल्ल्यास १७ वर्षे लोटल्यावर त्याविषयी बोलणाऱ्यांनी, त्या वेळी आपण काय केले हेही सांगावे...***

अनुकूलता प्रत्येकासाठी आनंददायी असली तरी एखादी व्यक्ती प्रतिकूलतेचा सामना कशी करते त्यावरून तिचे चारित्र्य आणि चाल यांचे दर्शन घडते. हे सत्य लागू केल्यास माजी केंद्रीय गृहमंत्री पी. चिदम्बरम यांचे स्वभाव-वास्तव सध्या त्यांच्या विधानांतून समोर येते. त्यांनी अलीकडेच २६/११ चा दहशतवादी हल्ला, इंदिरा गांधी यांस ज्यामुळे प्राण गमवावे लागले ते ऑपरेशन ब्लू स्टार आदींबाबत काही भाष्य करून स्वपक्षाची कोंडी केली. काँग्रेस पक्षात जी काही अत्यंत बुद्धिमान व्यक्तिमत्त्वे आहेत त्यात चिदम्बरम हे एक अव्वल. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालात काँग्रेस या एकमेव पक्षाने राजकीय पैस व्यापलेला होता. त्यामुळे विविध क्षेत्रांतील गुणवान साहजिकच त्या पक्षाकडे आकृष्ट झाले. नंतर प्रदीर्घ काळ सत्ता त्याच पक्षाहाती राहिल्याने हा गुणवंतांचा प्रवाह काँग्रेसकडे अव्याहत होता.

परीक्षेसाठी अर्ज स्वीकारण्यापासून ही संस्था वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. जयपूर उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाने समुपदेशन थांबवलेले नसले, तरी ज्या पद्धतीने ‘नीट’ परीक्षा घेतल्या आणि वाढीव गुणांमुळे जो गोंधळ घातला, त्यावरचे चिंतन- मनन आवश्यक आहे.

# ‘नॅशनल टेस्ट एजन्सी’ची विश्वासार्हता धोक्यात !

राष्ट्रीय स्तरावरील प्रवेश परीक्षांमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी सरकारने ‘नॅशनल टेस्टिंग एजन्सी’ (एनटीए) ची स्थापना केली होती. संसदेच्या कायद्याने निर्माण केलेल्या या स्वायत्त संस्थेची जबाबदारी राष्ट्रीय स्तरावरील अभियांत्रिकी महाविद्यालये, वैद्यकीय महाविद्यालये, केंद्रीय विद्यापीठे यासारख्या उच्च शिक्षणाच्या संस्थांसाठी प्रवेश परीक्षा घेणे आणि त्यांचे निकाल जाहीर करणे ही आहे. या संस्थेला संपूर्ण पारदर्शकतेने आंतरराष्ट्रीय मानकांनुसार परीक्षा घेण्याची जबाबदारी देण्यात आली होती; पण ‘नीट’ परीक्षेच्या निकालावर उपस्थित झालेल्या प्रश्नांमुळे ही संस्था आणि तिचे काम संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहे. या वादानंतर काही मुले आणि त्यांच्या पालकांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करून ‘नीट’ परीक्षा पुन्हा घेण्यात यावी आणि प्रवेशासाठी समुपदेशनावर बंदी घालण्याची मागणी केली होती. सर्वोच्च न्यायालयाने या मागण्या



मान्य केल्या नसल्या, तरी टिप्पणी करताना ‘एनटीए’कडून उत्तर मागितले होते. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या टिप्पणीत परीक्षेच्या पावित्र्याला बाधा पोहोचल्याचे मान्य केले आहे. या संस्थेचे प्रमुख प्रदीप जोशी हे देशातील सर्वात संवेदनशील आणि सर्वोच्च परीक्षा आयोजित करणाऱ्या केंद्रीय लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष राहिले आहेत. त्यांची नियुक्ती करताना ‘एनटीए’मध्येही ते केंद्रीय लोकसेवा आयोगाचे पावित्र्य राखतील असा विचार झाला असावा; परंतु ‘नीट’ निकालानंतर निर्माण झालेल्या वादामुळे तसे होताना दिसत नाही. केंद्र सरकार भलेही ‘नीट’ परीक्षेत गैरव्यवहार झाला नाही असे म्हणत असले, तरी त्यावर शेंबडे पोरही विश्वास ठेवणार नाही. सर्वोच्च न्यायालयाने ‘एनटीए’ला ग्रेस गुण दिलेल्या १५६३ विद्यार्थ्यांची गुणपत्रिका रद्द करून त्यांची पुनर्परीक्षा घेण्याचे निर्देश दिले आहेत. ही परीक्षा २३ जून रोजी होणार आहे. १५६३ मुलांना वाढीव गुण का दिले, या प्रश्नाचे उत्तर ‘एनटीए’ला देता आले नाही. ‘एनटीए’ने वाढीव गुण दिलेल्या विद्यार्थ्यांना दोन पर्याय दिले आहेत. हे विद्यार्थी पुन्हा परीक्षेला बसू शकतात किंवा त्यांच्या जुन्या गुणांसह समुपदेशनासाठी पुढे जाऊ शकतात; परंतु त्यांच्या गुणपत्रिकेतून अतिरिक्त गुण काढून टाकले जातील. ज्या उमेदवारांना आपण पुनर्परीक्षेत चांगली कामगिरी करू शकतो, असा आत्मविश्वास आहे, ते पुनर्परीक्षेला बसण्याचा निर्णय घेऊ शकतात. ‘नीट’ निकालाच्या प्रतीक्षेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी चार जूनची रात्र गोंधळाचे कारण बनली. सुमारे सोळाशे मुलांना उच्च श्रेणी मिळाली.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

### लागवडीत पन्नास टक्के घट

### स्ट्रॉबेरीच्या रोपांचे उत्पादन घटले

# महाबळेश्वर स्ट्रॉबेरीस अतिवृष्टीचा फटका!

## रोपांची चांगली उगवण झाली नाही

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**लांबलेल्या पावसाचा महाबळेश्वर, वाई, जावली तालुक्यातील स्ट्रॉबेरी लागवडीस फटका बसला आहे. या अतिरिक्त पावसामुळे स्ट्रॉबेरीची रोपे तयार होऊ न शकल्यामुळे हा फटका बसला आहे. सध्या उपलब्ध रोपांवर या भागात केवळ पन्नास टक्केच स्ट्रॉबेरी लागवड झाली असून, ही आजवरची सर्वात कमी लागवड मानली जात आहे. दरम्यान, यंदा स्ट्रॉबेरीच्या रोपांच्या या टंचाईमुळे त्यांना परराज्यांतून मोठी मागणी आहे.**



सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर, वाई आणि जावली तालुके हे स्ट्रॉबेरी उत्पादनासाठी देशभर प्रसिद्ध आहेत. येथील थंड हवामान आणि सुपीक माती यांमुळे या भागात स्ट्रॉबेरीचे चांगले उत्पादन मिळते. विशेष म्हणजे याच अनुकूल भागात तयार झालेल्या मूळ रोपापासून (मदर प्लांट) तयार झालेल्या स्ट्रॉबेरीच्या रोपांना आता राज्याबरोबरच परराज्यांतही कायम मोठी मागणी असते.स्ट्रॉबेरीच्या मूळ रोपांपासून नवीन, दर्जेदार आणि रोगमुक्त रोपे तयार केली जातात. प्रत्येक हंगामात प्रतिएकरात दोन ते अडीच लाख रोपांची निर्मिती केली जाते. ही रोपे सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर, वाई आणि जावली तालुक्यांसह राज्यात अन्यत्र तसेच परराज्यांतील स्ट्रॉबेरी उत्पादकही खरेदी करतात. महाबळेश्वर परिसरातील अनेक शेतकरी केवळ अशी स्ट्रॉबेरी रोपे तयार करण्याची शेतीही करतात. मात्र यंदा मे महिन्यापासूनच सुरू झालेल्या मुसळधार पावसामुळे या शेतीचे गणित बिघडले. ही रोपे तयार करण्यासाठी आवश्यक जमीन तयार करण्यात अडचणी आल्या.रोपांच्या लागवडीनंतरही मोठ्या प्रमाणात पाऊस सुरू राहिल्याने शेतात कायम पाणी साचून राहिल्याने या रोपांची चांगली उगवण झाली नाही. उगवलेली रोपे पिवळी पडली. या साऱ्यांमुळे यंदा स्ट्रॉबेरी रोपांसाठी ओळखल्या जाणाऱ्या महाबळेश्वर, वाई आणि जावली या तीन तालुक्यांतील एकूण उत्पादनास मोठा फटका बसला आहे. स्ट्रॉबेरी लागवडीसाठी यंदा रोपेच उपलब्ध नसल्याने आतापर्यंत या तालुक्यातील स्ट्रॉबेरीची लागवड केवळ पन्नास टक्केच झाली असून, ही आजवरची सर्वात कमी लागवड मानली जात आहे.स्ट्रॉबेरीच्या प्रतिरोपांचा दर यंदा ८ ते १२ रुपयांवर गेला आहे. त्यामुळे सध्या ज्यांच्याकडे स्ट्रॉबेरीची रोपे आहेत, त्यांना मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळत आहे. दरम्यान, या टंचाईमुळे स्ट्रॉबेरी रोपांना राज्यांतर्गतच नाही, तर राज्याबाहेरून यंदा मोठी मागणी आहे. परराज्यांतील अनेक शेतकरी आणि एजंट सध्या थेट महाबळेश्वर, वाई आणि जावली तालुक्यांमध्ये येऊन रोपे खरेदी करतात. पंजाब, हरयाणा, दिल्ली, तमिळनाडू, मध्य प्रदेश आणि हैदराबाद येथील शेतकरीदेखील येथे येऊन रोपे खरेदी करतात. सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर, वाई आणि जावली तालुके हे स्ट्रॉबेरी उत्पादनासाठी देशभर प्रसिद्ध आहेत. येथील थंड हवामान आणि सुपीक माती यांमुळे या भागात स्ट्रॉबेरीचे चांगले उत्पादन मिळते. विशेष म्हणजे याच अनुकूल भागात तयार झालेल्या मूळ रोपापासून (मदर प्लांट) तयार झालेल्या स्ट्रॉबेरीच्या रोपांना आता राज्याबरोबरच परराज्यांतही कायम मोठी मागणी असते.स्ट्रॉबेरीच्या मूळ रोपांपासून नवीन, दर्जेदार आणि रोगमुक्त रोपे तयार केली जातात. प्रत्येक हंगामात प्रतिएकरात दोन ते अडीच लाख रोपांची निर्मिती केली जाते. ही रोपे सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर, वाई आणि जावली तालुक्यांसह राज्यात अन्यत्र तसेच परराज्यांतील स्ट्रॉबेरी उत्पादकही खरेदी करतात. महाबळेश्वर परिसरातील अनेक शेतकरी केवळ अशी स्ट्रॉबेरी रोपे तयार करण्याची शेतीही करतात. मात्र यंदा मे महिन्यापासूनच सुरू झालेल्या मुसळधार पावसामुळे या शेतीचे गणित बिघडले. ही रोपे तयार करण्यासाठी आवश्यक जमीन तयार करण्यात अडचणी आल्या.रोपांच्या लागवडीनंतरही मोठ्या प्रमाणात पाऊस सुरू राहिल्याने शेतात कायम पाणी साचून राहिल्याने या रोपांची चांगली उगवण झाली नाही. उगवलेली रोपे पिवळी पडली.

### परराज्यांतून मोठी मागणी

या साऱ्यांमुळे यंदा स्ट्रॉबेरी रोपांसाठी ओळखल्या जाणाऱ्या महाबळेश्वर, वाई आणि जावली या तीन तालुक्यांतील एकूण उत्पादनास मोठा फटका बसला आहे. स्ट्रॉबेरी लागवडीसाठी यंदा रोपेच उपलब्ध नसल्याने आतापर्यंत या तालुक्यातील स्ट्रॉबेरीची लागवड केवळ पन्नास टक्केच झाली असून, ही आजवरची सर्वात कमी लागवड मानली जात आहे.

# शिंदेंनी सुरू केलेल्या योजना बंद केल्या?

## देवेंद्र फडणवीसांचे विरोधकांच्या आरोपांवर स्पष्टीकरण

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारकडून एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असल्याच्या काळात सुरू करण्यात आलेल्या योजना बंद केल्या जात असल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. शिवसेनेचे (उबाठा) नेते अंबादास दानवे यांनी सोशल मीडियावर अशा आठ योजनांची यादीच जाहीर केली आहे.**



'मात्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा आरोप फेटाळून लावला आहे. आपण कोणतीही योजना बंद केली नसल्याचे फडणीस म्हणाले आहेत.अंबादास दानवे यांनी केलेल्या दाव्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले,"अंबादास दानवे यांना एकनाथ शिंदे यांच्याबद्दल एक ट्वीट करण्याची इच्छा झाली, हे देखील महत्त्वाचं आहे. पण त्यांच्यासहित मी सर्वांना सांगतो की कुठल्याही योजना बंद करण्याचा आमचा विचार नाही. मी सगळ्या योजना चालवणार आहे. कुठलीच योजना आम्ही बंद करणार नाही."एखाद दुसरी योजना काही काळासाठी डेफर (स्थगित) होऊ शकते, कारण आता आमच्यावर या संकटामुळे मोठा भार पडलेला आहे. पण आता तरी कुठलीच योजना आम्ही डेफर (स्थगित) देखील केलेली नाही. त्यामुळे मला असं वाटत नाही की कुठली योजना बंद होईल," असे फडणवीस म्हणाले."ज्या आमच्या फ्लॅगशीप योजना आहेत, लाडकी बहीण योजना असेल, शेतकऱ्यांना वीज माफीची योजना असेल, यातील आमची कुठलीच योजना बंद होणार नाही," असेही फडणीस यांनी यावेळी स्पष्ट केले."सामान्यांना कणभर लाभाची अपेक्षा असलेल्या योजना बंद करून देवेंद्र फडणवीस सरकारने आपल्याच सहकाऱ्यांच्या निर्णयांवर फुल्या मारल्या आहेत. अमच्यातून गेलेले 'कटप्रमुख' मात्र यावर शब्द न बोलता महाशक्तीच्या लाडक्या बुलेट ट्रेनची री ओढताना आपल्याला दिसतील.. शिंदेंच्या या योजना बंद..योजना बंद करणारे हे चालू सरकार आहे. निवडणुकांपुरत्या या सगळ्या योजनांचा भंपकपणा जनतेपुढे निश्चित मांडू. तशा त्यांच्यात चर्चा देखील सुरू आहेत. ते महाविकास आघाडीत गेले तर त्याचा फटका महायुतीला बसू शकतो असा प्रश्न मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारण्यात आला. यावर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

### महायुती निवडणुका जिंकणार

कोण कोणासोबत जाईल हे आज सांगता येत नाही. पण एवढं निश्चितपणे सांगतो की कोणीही कोणासोबत गेलं तरी महाराष्ट्रामध्ये भाजपा आणि महायुती हेच या निवडणुका जिंकणार आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये अतिशय उत्तम यश महाराष्ट्र आम्हाला देईल हा मला विश्वास आहे".

## मोदी यांनी ट्रम्प यांचे कौतुक केले

## डोनाल्ड ट्रम्प यांचे केले खास कौतुक

# इस्रायली ओलिसांच्या सुटकेचे स्वागत!

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**इस्रायल आणि हमास यांच्यातील युद्ध संपुष्टात आले आहे. हमासने इस्रायलच्या ओलीस ठेवलेल्या २० नागरिकांना सोडून दिले आहे. यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व ओलिसांच्या सुटकेच्या निर्णयाचे स्वागत केले आहे. भारत या भागात शांतता प्रस्थापित करण्यासाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रामाणिक प्रयत्नांचे समर्थन करतो असे मोदी म्हणाले आहे.**

## सुटकेच्या निर्णयाचे स्वागत केले



ट्रम्प यांच्या गाझा शांतता प्रस्तावाच्या पहिल्या टप्प्याचा भाग म्हणून हमासने दोन वर्षांपेक्षा जास्त काळापासून बंधनात ठेवलेल्या इस्रायली ओलीसांना सोमवारी मुक्त केले आहे. त्यानंतर अखेर हे जिवंत इस्रायलमध्ये परतले आहेत. या युद्धविरामानंतर अखेर दोन वर्ष चाललेले युद्ध थांबले आहे.पंतप्रधान मोदींनी हजारो लोकांचे प्राण घेणाऱ्या या युद्धाच्या समाप्तीनंतर सोशल मीडियावर पोस्ट केली आहे. “दोन वर्षांहून अधिक काळ बंदिवासात असलेल्या सर्व ओलिसांच्य सुटकेचे आम्ही स्वागत करतो,” असे पंतप्रधान मोदी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हणाले आहेत. “त्यांची सुटका ही त्यांच्या कुटुंबीयांच्या धाडसाला, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या अविचल शांतता प्रयत्नांना आणि पंतप्रधान नेतान्याहू यांच्या मजबूत निर्धाराला केलेले अभिवादन आहे. या प्रदेशात शांतता प्रस्थापित करण्याच्या राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या प्रामाणिक प्रयत्नांना आमचा पाठिंबा आहे,” असेही पंतप्रधान मोदी म्हणाले आहेत.

सोमवारी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्रायल आणि हमासमधील युद्ध संपल्याची अधिकृत घोषणा केली. पत्रकारांशी बोलताना ट्रम्प यांनी युद्धबंदी कायम राहील असा विश्वास व्यक्त केला शुक्रवारी सकाळी युद्धबंदी कराराचा भाग म्हणून हमासने २० जिवंत असलेल्या इस्रायली बंधकांना सोडले . या करारानुसार, इस्रायलने १,९०० हून अधिक पॅलेस्टिनी कैद्यांना सोडले आणि दुष्काळग्रस्त गाझाला अन्न आणि मदत पुरवठा वाढविण्याचेही मान्य केले.शुक्रवारी सकाळी लागू झालेली ही युद्धबंदी ट्रम्प यांच्या २० कलमी गाझा शांतता योजनेच्या पहिल्या टप्प्यानुसार करण्यात आले आहे . युद्धबंदी करारांतर्गत , हमास आणि इस्रायलने सर्व ओलिसांना सोडले आहे . ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासने इस्रायलवर केलेल्या हल्ल्यांनी युद्ध सुरू झाले . तेव्हापासून इस्रायलने प्रत्युत्तरादाखल केलेल्या लष्करी कारवाईत ६७,००० हून अधिक पॅलेस्टिनी मारले गेले आहेत . युद्धबंदीमध्ये भूमिका बजावल्याबद्दल ट्रम्प यांनी इस्रायलचे पंतप्रधान नेतान्याहू आणि कतार यांच्या भूमिकेचे कौतुक केले. इस्रायल

## पंतप्रधान मोदी काय म्हणाले?

सोमवारी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्रायल आणि हमासमधील युद्ध संपल्याची अधिकृत घोषणा केली. पत्रकारांशी बोलताना ट्रम्प यांनी युद्धबंदी कायम राहील असा विश्वास व्यक्त केला शुक्रवारी सकाळी युद्धबंदी कराराचा भाग म्हणून हमासने २० जिवंत असलेल्या इस्रायली बंधकांना सोडले . या करारानुसार, इस्रायलने १,९०० हून अधिक पॅलेस्टिनी कैद्यांना सोडले आणि दुष्काळग्रस्त गाझाला अन्न आणि मदत पुरवठा वाढविण्याचेही मान्य केले.

आणि हमास यांच्यातील युद्ध संपुष्टात आले आहे. हमासने इस्रायलच्या ओलीस ठेवलेल्या २० नागरिकांना सोडून दिले आहे. यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व ओलिसांच्या सुटकेच्या निर्णयाचे स्वागत केले आहे. भारत या भागात शांतता प्रस्थापित करण्यासाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रामाणिक प्रयत्नांचे समर्थन करतो असे मोदी म्हणाले आहे.

ट्रम्प यांच्या गाझा शांतता प्रस्तावाच्या पहिल्या टप्प्याचा भाग म्हणून हमासने दोन वर्षांपेक्षा जास्त काळापासून बंधनात ठेवलेल्या इस्रायली ओलीसांना सोमवारी मुक्त केले आहे. त्यानंतर अखेर हे जिवंत इस्रायलमध्ये परतले आहेत. या युद्धविरामानंतर अखेर दोन वर्ष चाललेले युद्ध थांबले आहे.पंतप्रधान मोदींनी हजारो लोकांचे प्राण घेणाऱ्या या युद्धाच्या समाप्तीनंतर सोशल मीडियावर पोस्ट केली आहे. “दोन वर्षांहून अधिक काळ बंदिवासात असलेल्या सर्व ओलिसांच्य सुटकेचे आम्ही स्वागत करतो,” असे पंतप्रधान मोदी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हणाले आहेत. “त्यांची सुटका ही त्यांच्या कुटुंबीयांच्या धाडसाला, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या अविचल शांतता प्रयत्नांना आणि पंतप्रधान नेतान्याहू यांच्या मजबूत निर्धाराला केलेले अभिवादन आहे. या प्रदेशात शांतता प्रस्थापित करण्याच्या राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या प्रामाणिक प्रयत्नांना आमचा पाठिंबा आहे,” असेही पंतप्रधान मोदी म्हणाले आहेत.

# शांततेचा नोबेल पुरस्कार हुकला, हरकत नाही!

## डोनाल्ड ट्रम्प यांना मिळणार इस्रायलच्या सर्वोच्च सन्मान

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**गेल्या दोन वर्षांपासून सुरू असलेले इस्रायल आणि हमासमधील युद्ध आता थांबले आहे. या युद्धबंदीच्या करारात अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. यामुळे ट्रम्प यांना नोबेल शांतता पुरस्काराचे प्रमुख दावेदार मानले जात होते. मात्र त्यांना हा सन्मान मिळू शकला नाही.**



असे असले तरी इस्त्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांनी सोमवारी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना ‘इस्रायल पुरस्कार (ISRAEL PRIZE)’साठी नामांकित केले आहे. इस्त्रायलच्या संसदेत (KNESSET) खासदारांना उद्देशून झालेल्या ट्रम्प यांच्या भाषणापूर्वी, नेतन्याहू म्हणाले की, ट्रम्प यांना ‘इस्रायल पारितोषिक’ (ISRAEL PRIZE) मिळवणारे पहिले गैर-इस्त्रायली नागरिक बनवण्यासाठी त्यांनी त्यांचे नामांकन सादर केले आहे.

पुढे ते म्हणाले की, “राहिला तो दुसऱ्या पुरस्कार, तर हा फक्त वेळेचा प्रश्न आहे, तुम्हाला तो मिळून जाईल!”नेतान्याहू यांनी

## ६७६०० हून अधिक लोक ठार

, युद्धविराम झाल्यानंतर आता येथे मोठ्या प्रमाणात मदत पाठवण्याची तयारी होत आहे. हे युद्ध ७ ऑक्टोबर २०२३ रोजी सुरू झाले होते. जेव्हा हमासच्या नेतृत्वाखालील गटाने इस्रायलवर हल्ला केला होता, ज्यामध्ये १२०० लोक ठार झाले होते तर २५० जणांना ओलीस ठेवण्यात आले होते. यानंतर इस्त्रायलने दिलेल्या प्रत्युत्तरात, गाझाच्या आरोग्य मंत्र्यांनी दिलेल्या माहितीनुसार ६७६०० हून अधिक लोक ठार झाले आहेत.

संसदेत बोलताना डोनाल्ड ट्रम्प यांची भरभरून स्तुती केली. नेतान्याहू यांनी ट्रम्प हे, “व्हाईट हाऊसमध्ये इस्रायलला लाभलेले आजपर्यंतचे सर्वात महान मित्र” असल्याचे म्हटले आहे. ते म्हणाले, “कोणत्याही अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाने इस्रायलसाठी यापेक्षा अधिक काही केलेले नाही.” पुढे बोलताना नेतान्याहू यांनी इस्त्रायलच्या सैनिकांचेही कौतुक केले, सैनिकांनी युद्धात हमासवर आश्चर्यचकित करणारे विजय मिळवले, असे ते म्हणाले. दोन वर्ष चाललेल्या युद्धात गाझा पूर्णपणे उद्ध्वस्त झाले आहे.

# तारक मेहता फेम बबीता थोडक्यात वाचली!

सध्या साऱ्या जगाचं लक्ष लागलं आहे ते इस्राइल आणि पॅलेस्टाईनमधील युद्धाकडे. शनिवारी सुरू झालेले दोन्ही देशांमधील युद्ध अजूनही सुरू असून तीव्र होत आहे. त्यातच आता या युद्धाबाबत नेटकऱ्यांनी सोशल मीडियावर अनेक प्रतिक्रिया दिल्या आहेत. तर भारताने इस्राइलला पाठिंबा दिला आहे. मात्र या सर्वात अभिनेत्री नुरसत भरुचाची जास्त चर्चा रंगली. दोन्ही देशांच्या या युद्धात नुसरत वाईटरित्या अडकली होती. अखेर भारतीय दुतावासाच्या मदतीने तिला भारतात सुखरूप आणण्यात आले आहे. मात्र नुसरतच नाही तर आणखी एक अभिनेत्री इस्राइलला अडकली असती. पण तिचं दैव्य बलवत्तर म्हणुन ती थोडक्यात बचावली आहे. ती अभिनेत्री आहे 'तारक मेहता का उल्टा चष्मा' फेम बबिता म्हणजेच मुनमुन दत्ता. आता मुनमुनने स्वतः सोशल मीडियाच्या माध्यमातून एक पोस्ट करत ती या युद्धात अडकण्यापासून कशी थोडक्यात बचावली या बाबात तिच्या चाहत्यांना सांगितले आहे. मुनमुन तिच्या इंस्टाग्राम स्टोरीत लिहिते, "मी तुम्हाला खरं सांगत आहे, सध्या मी इस्रायलमध्ये अडकली असती. माझी तिकिटेही बुक झाली होती, पण मला ती तिकीट तारीख पुढच्या आठवड्यात करावी लागली. 'तारक मेहता'मुळे अचानक माझी नाईट शिफ्ट वाढवण्यात आली. सुरुवातीला मला खूप वाईट वाटले पण आता मला समजले की जे काही होते ते चांगल्यासाठीच होते. मी आज माझा जीव गमावू शकले असते.




# दीपिकानंतर आता निक्कीचा नंबर!

टीव्ही मनोरंजन विश्वातील प्रसिद्ध अभिनेत्री निक्की तांबोळी ही नेहमीच तिच्या बोल्डनेसमुळे चर्चेत आली आहे. तिचा चाहतावर्ग मोठा आहे. तिला फॉलो करणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. आता निक्की एका वेगळ्याच कारणामुळे वादाचे कारण ठरताना दिसत आहे. यंदाच्या वर्षी जानेवारीमध्ये किंग खानचा पठाण नावाचा चित्रपट प्रदर्शित झाला होता. तो एका कारणामुळे खूपच चर्चेत आला होता. त्याचे एक महत्वाचे कारण म्हणजे दीपिकाच्या भगव्या रंगाच्या बिकीनीवरुन खूपच मोठा वाद झाला होता. काही धार्मिक संघटनांनी त्यावरुन आक्रमक पवित्राही घेतल्याचे दिसून आले होते. यासगळ्यात वेगवेगळ्या थिएटर्समध्ये पठाणचे शो बंद पाडण्याचा प्रकार दिसून आला होता. आता टीव्ही मनोरंजन क्षेत्रातील निक्की ही देखील वादाचे कारण ठरत आहे. तिचा भगवा रंगाची बिकीनी परिधान केलेला व्हिडिओ व्हायरल झाला आहे. त्यावर तिला मिळालेल्या प्रतिक्रियाही भलत्याच तिखट आहे. यावरुन काही नेटकऱ्यांनी या व्हिडिओवरुन काही धार्मिक प्रश्न देखील उपस्थित केल्याचे दिसून आले आहे. विरल भयानीनं तो व्हिडिओ व्हायरल केला आहे. यापूर्वी देखील निक्की तिच्या वेगवेगळ्या कारणांमुळे नेटकऱ्यांच्या प्रतिक्रियेचा विषय झाल्याचे दिसून आले आहे. भगवा रंग हा आता वादाचे कारण ठरतो आहे.त्यामुळेच की काय त्यावरुन कित्येक बॉलीवूडच्या सेलिब्रेटींनी विविध प्रतिक्रिया देत नाराजी व्यक्त केली होती. आपण कशालाही भावनिक स्वरुप देत त्यावरुन वाद तयार करतो असा सूर सेलिब्रेटींनी आळवला होता. निक्किला नेटकऱ्यांनी ज्या प्रतिक्रिया दिल्या आहेत त्यातून तिच्यावर परखड शब्दांत निशाणा साधण्यात आला आहे. अशा रंगाची बिकीनी परिधान करुन तुला काय सांगायचे आहे हे जरा कळू शकेल का असा प्रश्न नेटकऱ्यांनी तिला केला आहे. काहींनी तिच्या सौंदर्याचे कौतुकही केले आहे.



# लग्न नको रे बाबा

बॉलीवूडमधील निवडक काही चित्रपटांमध्ये तसेच वेब सीरिजमध्ये प्रभावी अभिनय करणाऱ्या सयानीचा चाहतावर्ग मोठा आहे. तिच्या अभिनयाचे चाहते प्रचंड आहेत. सोशल मीडियावर नेहमीच वेगवेगळ्या कारणासाठी ॲक्टिव्ह असणाऱ्या सयानीनं वयाची ३८ वर्षे पूर्ण केल्यानंतर देखील तिनं लग्न केलेलं नाही. सयानीच्या जन्मदिनानिमित्तानं तिला चाहत्यांनी खूप साऱ्या शुभेच्छा दिल्या आहेत. तिचं कौतुकही केलं आहे. काही झालं तरी तिचे चाहते आणि नेटकरी तिला हमखास तिच्या लग्नावरुन प्रश्न विचारतातच. अशात सयानी देखील सगळ्यांना उत्तरं देत बसत नाही. सयानीच्या चित्रपटांविषयी सांगायचे झाल्यास तिनं आतापर्यत पोशम पा, आर्टिकल १५, मार्गारिटा विद द स्ट्रॉ, सारख्या चित्रपटांनी प्रेक्षकांच्या मनावर गारुड केले आहे. बॉलीवूडमध्ये एका वेगळ्या शैलीच्या अभिनयासाठी सयानीकडे पाहिले जाते. सयानी ही केवळ अभिनेत्रीच नाहीतर की चांगली व्हाईस ओव्हर आर्टिस्ट आणि गायिका म्हणूनही लोकप्रिय आहे. सयानी तिच्या प्रोफेशनल लाईफमध्ये यशस्वी झाली आहे. मात्र तिला तिच्या वैयक्तिक आयुष्यावरुन नेहमीच ट्रोल केले गेले आहे.



# गौतमीच्या डान्सची सापालाही पडली भुरळ!

सध्या महाराष्ट्रातील एकही जिल्हा असा नाही की ज्याठिकाणी गौतमीचा कार्यक्रम पार पडला नाही. वेगवेगळ्या शहरांमध्ये गौतमीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. त्याला प्रेक्षकांचा, चाहत्यांचा मोठा प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले आहे. शहरात गौतमीच्या नृत्याचे कार्यक्रम झाले आहेत तिथे नेहमीच वेगवेगळ्या प्रकारचे गोंधळ झाला आहे. अशातच पुन्हा एका नव्या घटनेनं चर्चेला उधाण आले आहे. त्याचे झाले असे की, मुंबईतील मानसरोवर रेल्वे स्थानकाजवळ गौतमीच्या नृत्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी त्या कार्यक्रमात साप शिरल्यानं काही प्रमाणात गोंधळ झाल्याचे दिसून आले आहे.

# तर मी गुदमरुन मेले असते: स्वरा भास्कर

अभिनेत्री स्वरा भास्कर ही तिच्या रोखठोक वक्तव्यांसाठी आणि तशाच प्रकारच्या खोचक पोस्टसाठी ओळखली जाते. अनेकदा तिला यासाठी ट्रोलिंगचाही सामना करावा लागला आहे. मात्र ट्रोलर्सची पर्वा न करता स्वरा भास्करने तिला जे वाटतं आहे ते कायमच व्यक्त केलं आहे. स्वरा भास्करने फहाद अहमदशी लग्न केलं. या दोघांना एक मुलगीही आहे. तिने मुस्लिम तरुणाशी लग्न केल्यानेही तिला ट्रोल व्हावं लागलं होतं. अशात स्वराने नुकतीच एक खास भूमिका मांडली आहे.समजा युद्ध झालं आणि माझ्यावर गोळी चालली, तर मी ती झेलायला तयार आहे. प्रत्यक्षात तुम्हाला गोळी लागते तेव्हा त्याचे परिणाम भोगावे लागतात. माझी मुलगी राबिया जन्माला यायची होती त्याआधी अभिनय हे माझं पहिलं प्रेम होतं. मला अभिनय करायला, वेगवेगळ्या भूमिका साकारायला खूप आवडत होतं. मला तितक्या संधी मिळाल्या नाहीत. मला वादग्रस्त अभिनेत्रीचा टॅग लागला. मला तो माझ्याच रोखठोक आणि बेधडक वक्तव्यांमुळे लागला याची मला कल्पना आहे.



## काय गरज होती?

## सोशल मीडियावर भन्नाट मीम्स व्हायरल

# Six मारण्याच्या प्रयत्नात जैस्वाल बाद

### विजयासाठी १२१ धावांचे आव्हान

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत विरुद्ध वेस्ट इंडिज यांच्यातील दुसरा कसोटी सामना दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियममध्ये सुरू आहे. पहिल्या सामन्यात एकतर्फी पराभवाचा सामना करावा लागणाऱ्या वेस्ट इंडिजने दुसऱ्या डावात दमदार पुनरागमन केलं. भारताने वेस्ट इंडिजला फॉलोऑन दिला होता. पण वेस्ट इंडिजच्या फलंदाजांनी पिछाडी भरून काढली आणि भारतीय संघासमोर विजयासाठी १२१ धावांचे आव्हान ठेवले.**



या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या भारतीय संघाकडून यशस्वी जैस्वाल मोठा फटका मारण्याच्या प्रयत्नात बाद झाला. दरम्यान जैस्वाल बाद होताच सोशल मीडियावर भन्नाट मीम्स व्हायरल झाले आहेत. भारतीय संघाला हा सामना जिंकण्यासाठी १२१ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी केएल राहुल आणि यशस्वी जैस्वालची जोडी मैदानावर आली. धावांचा पाठलाग करताना जैस्वालने पहिल्याच षटकात खणखणीत चौकार मारला. त्यानंतर त्याने आणखी एक चौकार मारला. २ चौकार मारल्यानंतर त्याने आणखी एक मोठा फटका मारण्याचा प्रयत्न केला. या नादात सीमारेषेवर तो झेलबाद होऊन माघारी परतला. त्यामुळे पहिल्या डावात १७५ धावांची खेळी करणारा जैस्वाल दुसऱ्या डावात अवघ्या ८ धावांवर माघारी परतला.या सामन्यातील पहिल्या डावात यशस्वी जैस्वालने १७५ धावांची खेळी केली होती. या खेळीनंतर त्याने वेस्ट इंडिजचा दिग्गज खेळाडू ब्रायन लाराची भेट घेतली होती. त्यावेळी ब्रायन लारा त्याला म्हणाले होते की, आमच्या गोलंदाजांना जास्त मारू नकोस. आता जैस्वाल स्वस्तात बाद झाल्यानंतर जैस्वाल आणि लारा यांच्या फोटोचे मीम्स बनवून व्हायरल केले जात आहेत. सामन्यातील पहिल्या डावात वेस्ट इंडिजचा डाव अवघ्या २४८ धावांवर आटोपला.

वेस्ट इंडिजला फॉलोऑन मिळाल्याने पुन्हा एकदा फलंदाजीला यावं लागलं. वेस्ट इंडिजने ही पिछाडी भरून काढली आणि ३९० धावा केल्या. वेस्ट इंडिजने भारतीय संघासमोर विजयासाठी १२१ धावांचे आव्हान ठेवले आहे. या धावांचा पाठलाग करताना चौथ्या दिवसाअखेर भारतीय संघाने १ गडी बाद ६३ धावा केल्या आहेत. भारतीय संघाला हा सामना आणि मालिका जिंकण्यासाठी अजूनही ५८ धावांची गरज आहे. केएल राहुल २५ तर साई सुदर्शन ३० धावांवर नाबाद आहेत.या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या भारतीय संघाकडून यशस्वी जैस्वाल मोठा फटका मारण्याच्या प्रयत्नात बाद झाला. दरम्यान जैस्वाल बाद होताच सोशल मीडियावर भन्नाट मीम्स व्हायरल झाले आहेत. भारतीय संघाला हा सामना जिंकण्यासाठी १२१ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी केएल राहुल आणि यशस्वी जैस्वालची जोडी मैदानावर आली. धावांचा पाठलाग करताना जैस्वालने पहिल्याच षटकात खणखणीत चौकार मारला. त्यानंतर त्याने आणखी एक चौकार मारला. २ चौकार मारल्यानंतर त्याने आणखी एक मोठा फटका मारण्याचा प्रयत्न केला. या नादात सीमारेषेवर तो झेलबाद होऊन माघारी परतला. त्यामुळे पहिल्या डावात १७५ धावांची खेळी करणारा जैस्वाल दुसऱ्या डावात अवघ्या ८ धावांवर माघारी परतला.या सामन्यातील पहिल्या डावात यशस्वी जैस्वालने १७५ धावांची खेळी केली होती. या खेळीनंतर त्याने वेस्ट इंडिजचा दिग्गज खेळाडू ब्रायन लाराची भेट घेतली होती. त्यावेळी ब्रायन लारा त्याला म्हणाले होते की, आमच्या गोलंदाजांना जास्त मारू नकोस. आता जैस्वाल स्वस्तात बाद झाल्यानंतर जैस्वाल आणि लारा यांच्या फोटोचे मीम्स बनवून व्हायरल केले जात आहेत. सामन्यातील पहिल्या डावात वेस्ट इंडिजचा डाव अवघ्या २४८ धावांवर आटोपला. वेस्ट इंडिजला फॉलोऑन मिळाल्याने पुन्हा एकदा फलंदाजीला यावं लागलं. वेस्ट इंडिजने ही पिछाडी भरून काढली आणि ३९० धावा केल्या. वेस्ट इंडिजने भारतीय संघासमोर विजयासाठी १२१ धावांचे आव्हान ठेवले आहे. या धावांचा पाठलाग करताना चौथ्या दिवसाअखेर भारतीय संघाने १ गडी बाद ६३ धावा केल्या आहेत. भारतीय संघाला हा सामना आणि मालिका जिंकण्यासाठी अजूनही ५८ धावांची गरज आहे.

### दुसऱ्या डावात दमदार पुनरागमन

पहिल्या सामन्यात एकतर्फी पराभवाचा सामना करावा लागणाऱ्या वेस्ट इंडिजने दुसऱ्या डावात दमदार पुनरागमन केलं. भारताने वेस्ट इंडिजला फॉलोऑन दिला होता. पण वेस्ट इंडिजच्या फलंदाजांनी पिछाडी भरून काढली आणि भारतीय संघासमोर विजयासाठी १२१ धावांचे आव्हान ठेवले.

# सामना जिंकला, पण जीव गमावला!

## विजय साजरा करतानाच क्रिकेटपटूला हृदयविकाराचा झटका

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**क्रिकेट खेळताना हृदयविकाराच्या झटक्याने निधन होण्याच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहे. टी-२० क्रिकेटमध्ये सामना जिंकल्यानंतर सेलिब्रेशन करताना एका क्रिकेटपटूचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची घटना उत्तर प्रदेशातील मुरादाबादमध्ये घडली आहे. संघाच्या कर्णधाराने सीपीआर देऊन त्याचा जीव वाचवण्याचा प्रयत्न केला, पण त्याच्या प्रयत्नांना यश मिळालं नाही.**



रविवारी (१२ ऑक्टोबर) मुरादाबादमध्ये यूपी व्हेटरन्स क्रिकेट असोसिएशनकडून टी-२० क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत मुरादाबाद आणि संभल या दोन्ही संघांमध्ये सामना सुरू होता. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजीसाठी आलेल्या मुरादाबाद संघाने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांअखेर ९ गडी बाद १३४ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या संभल संघाला २० षटकांअखेर ६ गडी बाद १२१ धावांपर्यंत मजल मारता आली. मुरादाबाद संघाकडून शेवटचे षटक टाकण्यासाठी अहमर खान गोलंदाजीला आला. शेवटच्या षटकात आपल्या संघाला विजय मिळताच अहमर खानने हात वर करून जल्लोष केला. पण इतक्यात तो जमिनीवर पडला. संघातील खेळाडूंनी त्याला सीपीआर दिला. पण सीपीआर देऊनही कुठलीही हालचाल न जाणवल्याने त्याला तातडीने जवळच्या रूग्णालयात घेऊन जाण्यात आलं.क्रिकेटच्या मैदानावर विजय मिळवल्यानंतर जल्लोष करणारा अहमर खान आयुष्याच्या शर्यतीत मात्र हरला. अहमर खानचं हृदयविकाराच्या झटक्याने निधन झालं आहे.

### हा मुराबादमध्ये खूप प्रसिद्ध होता

ही बातमी वाऱ्याच्या वेगाने पसरली. पण या गोष्टीवर कोणाचा विश्वासच बसत नव्हता. अहमर खान हा माजी भारतीय खेळाडू पियूष चावलासोबत लोकल क्रिकेटमध्ये बरेच सामने खेळला होता.अहमर खान हा मुराबादमध्ये खूप प्रसिद्ध होता. बऱ्याच वर्षांपासून तो त मुरादाबादकडून माजी खेळाडूंच्या क्रिकेट स्पर्धेत सहभाग घेत होता.

स्मार्ट PCMC SMART CITY
# महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। ।मंगळवार।
।दि. 14 ऑक्टोबर 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

www.rklgis.org

RKL GALAXY™
International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution

RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING

## ADMISSION OPEN FOR THE YEAR 2026-27

NURSERY - STD X

What we Offer?

- CBSE Curriculum
- Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
- Digital Classrooms with AV Facilities
- Skill Development Programs: Robotics Dance, Music, Speech & Drama Entrepreneurship
- Focus on Holistic Development

Enroll Now!



**Admission open for 2025-26 | Book Your Spot Today!**

8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज ™

ePaper

। ।मंगळवार।

।दि. 14 ऑक्टोबर 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

### सोसायटी फेडरेशन, स्वयंसेवी संस्था-संघटनांतर्फे नागरी सन्मान

# "पब्लिक सर्विस" केंद्रबिंदू ठेवूनच कर्तव्य पालन : शेखर सिंह

## "राजकारण हँडल करायला पिंपरी-चिंचवडने शिकवले : सिंह

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहराने राजकारण कसे ' हँडल' करायचे हे शिकवले. या भागात खूप वेगळ्या प्रकारची मते आहेत. मतभेद आहेत. परंतु, मनभेद नाहीत. शहर विकासासाठी सर्व मतप्रवाह एक होताना पाहिले आहेत. म्हणूनच "पब्लिक सर्विस" केंद्रबिंदू ठेवून काम केले. यासाठी कोणताही भेदभाव दाखविला नाही. स्वतंत्ररित्या प्रशासकीय अधिकारी म्हणून माझे काम चोख बजावले, अशा भावना पिंपरी-चिंचवडचे मावळते आयुक्त आणि नवनर्वाचित नाशिक कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह यांनी व्यक्त केल्या..**



सोसायटी फेडरेशन आणि विविध स्वयंसेवी संस्था- संघटना पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने आयुक्त शेखर सिंह यांचा नागरी सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. चिंचवड येथील ऑटो कलस्टर मध्ये रविवारी (दि.12) हा कार्यक्रम पार पडला. यावेळी आरजे श्रुती यांनी त्यांची प्रकट मुलाखत घेतली. कार्यक्रमांमध्ये भाजपा आमदार महेश लांडगे, संत साहित्याचे अभ्यासक तसेच संतपीठा संचालक डॉ. सदानंद मोरे यांच्यासह विविध संस्था, संघटनांचे प्रतिनिधी व शहरातील राजकीय, सामाजिक, आरोग्य, क्रीडा, उद्योग क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



यावेळी सोसायटी फेडरेशनचे संजीवन सांगळे, सचिन लोंढे, सुधीर देशमुख, अविरत श्रमदानचे निलेश लोंढे, मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचे दिपक करंदिकर, विकास डोळस, डॉ. सुहास कांबळे, प्रकाश जुंकटवार, सत्या त्रिपाठी, शिवलिंग ढवळेश्वर यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच, आराध्या कुलकर्णी या चिमुकल्या विद्यार्थिनीने “मला शेखर सिंहांसारखे आयुक्त व्हायचेय..” अशा आशयाचे मनोगत व्यक्त करीत उपस्थितांची दाद मिळवली.

मुलाखतीमध्ये बोलताना आयुक्त शेखर सिंह म्हणाले की, पिंपरी-चिंचवड शहरांमध्ये ' कोलाब्रेट स्पिरिट' खूप आहे. अनेक सेवा-संस्था या शहरासाठी अविरत झटताना दिसून येतात. सोसायटी फेडरेशन, विविध स्वयंसेवी संघटना शहर स्वच्छता, आरोग्य या मुद्द्यावर पुढे होऊन काम करत आहेत. याच माध्यमातून दिव्यांगांच्या विकाससाठी आपल्याला काम करता आले. या शहरातील लोकांनी आपल्याला भरपूर प्रेम दिले. त्यामुळे या शहरातून निरोप घेऊन पुढच्या प्रवासाला सुरुवात करणे हा माझ्यासाठी खूप भाऊ क्षण आहे.

### शेखर सिंह झाले भावूक...

आयुक्त शेखर सिंह या कार्यक्रमात भावूक झालेले पाहायला मिळाले. पुढे ते म्हणाले] “मी काय केले हे सांगत बसत नाही. शहराच्या विकासासाठी जे काही करता आले ते अतिशय चांगल्या प्रकारे केले. याचा परिणाम काही वेळा तात्काळ तर काही वेळा दूरगामी दिसून येईल. प्रशासक म्हणून काम करत असताना कोणासाठी कमी तर कोणासाठी जास्त केले असे काही वेळेला म्हटले गेले. मात्र वस्तुस्थिती तशी नाही पब्लिक सर्विस हा केंद्रबिंदू ठेवून काम केले आहे आणि ते शिस्तबद्ध करण्याचाच प्रयत्न करण्यात आलेला आहे, असे त्यांनी सांगितले.

तसेच, या शहराला राजकीय वारसा मोठा आहे. राजकारण कसे हँडल करावे या शहराने मला शिकवले. मात्र प्रशासकीय अधिकारी या नात्याने कोणताही भेदभाव न करता स्वतंत्रपणे , स्वतःच्या मतांनी शहराच्या विकासासाठी काम करायचे आहे. हेच तत्व मी जपले आणि यापुढेही आयुष्यभर हेच तत्व जपत राहणार आहे. माझ्या मनाला एखादी गोष्ट भिडली आणि ती समाज, शहर आणि नागरिकांसाठी महत्त्वाची आहे आणि तिचे दूरगामी परिणाम पुढील काळात दिसून येतील हे एकदा मनाशी पक्के केले तर मग ती पूर्ण करण्यासाठी मी कटिबद्ध असतो. हेच मी पिंपरी चिंचवड शहरासाठी केले. एसटीपी प्लांट, नदी प्रदूषण, टाऊन प्लॅनिंग यांसारख्या गोष्टी खूप चांगल्या प्रकारे पिंपरी चिंचवड शहरांमध्ये केल्या गेल्या आहेत. या अनुभवाचा चांगल्या प्रकारे वापर कुंभमेळ्यासाठी करता येणार आहे, असेही शेखर सिंह यांनी सांगितले.

#### समाविष्ट गावांचे काम कायम

स्मरणातराहील:आमदारलांडगे

आमदार महेश लांडगे यावेळी म्हणाले की, आयुक्त म्हणून आपली कारकीर्द पिंपरी-चिंचवड शहरासाठी अतिशय महत्त्वाची ठरणार आहे. खंत एकाच गोष्टीची आहे की आपणाला व्यक्तिगत माझ्यामुळे काही गोष्टींमध्ये खूप टीका सहन करावी लागली. त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करतो. पुढील 20 वर्षांचे नियोजन ठेवत आयुक्तांनी काम केले. विनाकारण वाद घालत त्यांनी वेळ घालवला नाही. 3 वर्ष 2 महिने आयुक्त शेखर सिंह यांच्यासोबत आपण काम केले. समाविष्ट गावांसाठी आपण केलेले काम उल्लेखनीय आहे. समाविष्ट गावांसाठी वाकडपासून चऱ्होली पर्यंत आपण केलेले काम या भागातील नागरिक हा कदपि विसरणार नाही, असेही आमदार लांडगे म्हणाले.

कार्यक्रमामध्ये प्रसिद्ध गायक अवधूत गांधी यांनी बहारदार सादरीकरण केले. सूत्रसंचालन निवेदक भूषण करंदीकर यांनी केले. पसायदान करुन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

#### सर्व क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रम...

यावेळी अतिरिक्त आयुक्त- 1 प्रदीप जांभळे-पाटील, अतिरिक्त आयुक्त-3 तृप्ती सांडभोर, क्रेडाईचे अरविंद जैन, बांधकाम क्षेत्रातील दिलीप पटेल, हॉटेल क्षेत्रातील उल्हास शेट्टी, सांगली कोल्हापूर सातारा मित्र परिवाराचे सुनील जाधव, आण्णाभाऊ साठे संस्थेचे संदीपान झोंबडे, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर समितीच्या वीना सोनवलकर, माता रमाई समितीचे निसर्गंध, वकील संघटना, सायकल मित्र संघटनेचे बापू शिंदे व सहकारी, हिंदुत्ववादी संघटनांचे प्रतिनिधी कुणाल साठे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रतिनिधी प्रसाद वाईकर, अनुलोमचे शिरीष भालेकर, महावितरणचे सिंहाजी गायकवाड, अतुल देवकर यांच्यासह माजी सैनिक संघ, ज्येष्ठ नागरिक महासंघ, कामगार संघटना प्रतिनिधी, रिक्षा संघटना प्रतिनिधी, पीसीएमसी कर्मचारी महासंघ प्रतिनिधी, महिला बचतगट प्रतिनिधी, सिंधी समाजाचे प्रतिनिधी कुमार कातरिया, राजस्थानी समाजाचे बाबलू वर्मा, अग्रवाल समाजाचे विकास गरग, उत्तर भारतीय समाज संघाचे राजेंद्र सिंह, मावळ असोसिएशन ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीचे विजय नाईक, इस्कॉनचे प्रशांत मोरे असे विविध क्षेत्रातील प्रतिनिधी उपस्थित होते.

## पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी

# योग्य उमेदवार नाहीत, तर आम्ही मैदानात उतरणार!

## सोसायटी फेडरेशनचा निर्धार : महानगरपालिका निवडणुकीसाठी ऐतिहासिक ठराव मंजूर

।पिंपरी चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी राजकीय पक्षांनी जर सुयोग्य, चारित्र्यसंपन्न, आणि गुणवत्तापूर्ण उमेदवार दिले नाहीत, तर आमचे स्वतःचे उमेदवार निवडणूक रिंगणात उतरवू, असा ठराव चिखली-मोशी-चऱ्होली-पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनच्या वतीने आयोजित विचारमंथन बैठकीत एकमुखाने मंजूर करण्यात आला. केले.**




“आमची चिखली-मोशी-चऱ्होली-पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशन ही अराजकीय सहकारी संस्था असली, तरी आम्ही सामाजिक भान ठेवून काम करत आहोत. पिंपरी चिंचवड शहराच्या विकासात आणि नियोजन प्रक्रियेत 90% सोसायटीधारकांचा सक्रिय सहभाग असावा, हीच आमची भूमिका आहे. येणाऱ्या महानगरपालिका निवडणुकीत भाग घेण्याबाबत कोणताही निर्णय घाईगडबडीत घेतला जाणार नाही. आम्ही प्रत्येक सोसायटीत जाऊन संवाद दौरे घेणार आहोत, नागरिकांची मते जाणून घेणार आहोत आणि त्यानंतर सर्वसंमतीने पुढील दिशा ठरवू. जर राजकीय पक्षांनी सुयोग्य, चारित्र्यसंपन्न उमेदवार दिले नाहीत, तर आम्ही आपले उमेदवार रिंगणात उतरवण्यास मागेपुढे पाहणार नाही.”

–**संजीवन सांगळे,** अध्यक्ष, चिखली-मोशी-चऱ्होली-पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशन.

बोऱ्हाडेवाडी येथील ऐश्वर्यम बँक्वेट हॉलमध्ये पार पडलेल्या या बैठकीत सुमारे 2000 प्रतिनिधींनी उपस्थित राहून सहभाग नोंदवला. महानगरपालिकेच्या कारभारात सोसायटीधारकांचा सक्रिय सहभाग असावा, ही भावना यावेळी ठळकपणे व्यक्त झाली.

संजीवन सांगळे, अध्यक्ष, सोसायटी फेडरेशन यांनी स्पष्ट केले, “आमची संस्था अराजकीय असूनही, शहराच्या विकासात आमच्या 90% सोसायटीधारकांचा सहभाग असावा अशी जनभावना आहे. म्हणूनच संवाद दौरे घेऊन आम्ही सर्वसामान्यांची मते जाणून घेणार आहोत आणि मगच निवडणूक लढवण्याबाबत अंतिम निर्णय घेणार आहोत.”

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही आशिया खंडातील आघाडीची महानगरपालिका असूनही, उपलब्ध आर्थिक स्रोतांचा उपयोग शहर विकासासाठी प्रभावीपणे होत नाही. सध्याच्या राजकीय व्यवस्थेत निर्णयप्रक्रियेत सोसायटीधारकांचा फारसा सहभाग नाही. शहराच्या नियोजनात, मूलभूत गरजांमध्ये आणि धोरणनिर्धारण प्रक्रियेत सोसायटीधारकांची भूमिका असावी, हा विचार अधोरेखित करण्यात आला. या पार्श्वभूमीवर, फक्त प्रेक्षकाची भूमिका न घेता फेडरेशनने प्रत्यक्ष निवडणुकीच्या मैदानात उतरावे, असा सूर अनेक सदस्यांनी मांडला. त्यासाठी सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांची एकत्रित बैठक घेण्यात येणार असून, पुढील दिशा ठरवण्यासाठी संवाद दौऱ्यांद्वारे लोकमताची चाचपणी केली जाईल. पुढील काही आठवड्यांत चिखली, मोशी, चऱ्होली तसेच इतर परिसरांतील सहकारी गृहनिर्माण संस्थांमध्ये संवाद दौरे राबवून, विविध प्रश्नांवर चर्चा केली जाणार आहे. या प्रक्रियेनंतर एकत्रित निर्णय घेऊन, योग्य ते उमेदवार उभे करण्याची तयारी फेडरेशनने दर्शवली आहे.



## विधायक उपक्रम: मराठवाड्यातील पूरग्रस्तांना

# दिलासा देणारा "एक हात मदतीचा"!

### माजी नगरसेविका नम्रता योगेश लोंढे व सामाजिक कार्यकर्ते योगेश लोंढे यांचा पुढाकार!

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भोसंकटाच्या काळात खऱ्या माणुसकीची ओळख पटते, आणि तीच ओळख इंद्रायणीनगर येथील माजी नगरसेविका नम्रता योगेश लोंढे आणि सामाजिक कार्यकर्ते योगेश लोंढे यांनी सिद्ध केली आहे. मराठवाडा आणि परिसरातील महापुराने उध्वस्त झालेल्या कुटुंबांच्या मदतीसाठी लोंढे यांनी घेतलेला पुढाकार सध्या शहरातच नव्हे, तर राज्यभर कौतुकाचा विषय ठरत आहे.**

#### आमदार महेश लांडगे यांच्या नेतृत्त्वात "त्या" कुटुंबांची दिवाळी गोड

भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पुढकाराने धारूर, अंबेजोगाई, लातूर, बीड, सोलापूर, नांदेड अशा ५० हून अधिक पूरग्रस्त गावांमध्ये मदतीचा हात पोहोचवण्यासाठी योगेश लोंढे यांच्या पुढाकाराने ५० ट्रक मदत साहित्य वितरीत करण्यात आले. या मदत किट्समध्ये तांदूळ, डाळ, पीठ, तेल, साखर, चहा, मसाले, मीठ, कांदे, बटाटे, फरसाण, बिस्किटे, मॅगी, ब्लँकेट्स, कपडे, औषधे अशा जीवनावश्यक वस्तूंचा समावेश करण्यात आला आहे.

मदतीच्या प्रत्येक टप्प्यावर स्वतःचा सहभाग ठेवणारे माजी नगरसेविका नम्रता योगेश लोंढे व सामाजिक कार्यकर्ते योगेश यांनी या उपक्रमासाठी शहरभरातून स्वयंसेवक, तरुण मंडळी आणि सामाजिक संस्था यांचे सहकार्य मिळवले. एक एक साहित्याचे पॅकेज, वितरणाचे नियोजन, ट्रकची व्यवस्था ते मदत प्रत्यक्ष पोहोचवण्यापर्यंत प्रत्येक बाबतीत लोंढे यांनी नेतृत्वाची भूमिका पार पाडली.

नांदेड जिल्ह्यातील बेग चिंचोली गावात भाजप आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली ६५० कीटचे वितरण करण्यात आले. यावेळी ग्रामस्थांनी योगेश लोंढे यांच्या कार्याचे विशेष कौतुक केले. "पूरामुळे आम्ही होत्याचे नव्हते झाले. पण योगेश लोंढे आणि त्यांच्या टीमने दिलेल्या मदतीने आम्हाला नव्याने उभं राहण्याची ताकद दिली," अशी भावना पूरग्रस्तांनी व्यक्त केली. योगेश लोंढे यांचं हे कार्य केवळ मदतीपुरतं मर्यादित न राहता, तरुणाईला सामाजिक जाणिवेची प्रेरणा देणारे आहे. "हे केवळ कर्तव्य नाही, तर माणुसकीचा धर्म आहे," अशा शब्दांत त्यांनी आपल्या कार्यामागील प्रेरणा व्यक्त केली.



> "मराठवाडा आणि परिसरातील पूरग्रस्तांना मदत करताना मला जाणवलं की ही मदत म्हणजे केवळ जीवनावश्यक वस्तू देणं नव्हे, तर त्यांच्या चेहऱ्यावर पुन्हा एकदा आशेचं हास्य फुलवण्याचा एक प्रयत्न आहे. जेव्हा एखाद्याच्या घरातलं सगळं वाहून गेलं असेल, तेव्हा आपण दिलेला एक ब्लँकेट, एक कीट, एक पाठीवरचा विश्वासाचा हात त्यांच्या सगळ्यात मोठ्या आधाराचा स्तंभ ठरतो. ही मदत म्हणजे दान नव्हे – ही आपल्या माणसांच्या दुःखात, वेदनेत आणि संघर्षात सहभागी होण्याची एक जबाबदारी आहे. संकटात साथ देणं हे माझ्यासाठी केवळ सामाजिक कार्य नाही, तर माणुसकीचा धर्म आहे."
>
> **–योगेश लोंढे, सामाजिक कार्यकर्ते, इंद्रायणीनगर.**

---

## व्यक्तिमत्व घडविण्यात संघाचा मोलाचा वाटा

### डॉ. निलेश भंडारी : कासारवाडी नगराचा विजयादशमी उत्सव उत्साहात साजरा

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी- चिंचवड : "राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या माध्यमातून समाजात सुसंस्कारित, कर्तव्यदक्ष व राष्ट्रनिष्ठ व्यक्तिमत्त्व घडवले जात आहे. मलादेखील संघाच्या शाखेतून उत्तम मूल्य आणि जीवनदृष्टी लाभली," असे गौरवोद्गार सुप्रसिद्ध वैद्यकीय चिकित्सक डॉ. निलेश भंडारी यांनी व्यक्त केले.**



कासारवाडी येथील विजयादशमी शस्त्रपूजन उत्सवात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी मंचावर सांगवी गटाचे माननीय संघचालक लक्ष्मण पवार, नगर कार्यवाह राजेंद्र राजहंस, तसेच पिंपरी-चिंचवड जिल्हा प्रचारप्रमुख सारंग पापळकर उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. भंडारी म्हणाले, "संघ शाखेत बौद्धिक व शारीरिक विकासासोबतच मूल्याधिष्ठित जीवनशैलीची शिकवण मिळते. हे संस्कार समाजात परिवर्तन घडवणारे ठरतात. संघाच्या सेवाकार्यामुळे देशभरात निस्वार्थ भावनेने कार्य करणारा मोठा कार्यकर्तावर्ग तयार झाला आहे."

प्रमुख वक्ते सारंग पापळकर यांनी आपल्या भाषणात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्याचा आढावा घेत, "संघाच्या शाखांमधून निर्माण होणारी व्यक्तिमत्त्वे समाजाच्या विविध क्षेत्रांत राष्ट्रहितासाठी कार्यरत आहेत. नैसर्गिक आपत्ती, युद्धजन्य परिस्थिती, तसंच सामाजिक संकटांच्या वेळी संघ स्वयंसेवक अग्रस्थानी राहतात," असे सांगितले.

संघ संस्थापक डॉ. हेडगेवार यांचे कार्य आणि स्वातंत्र्यलढ्यातील योगदान अधोरेखित करताना पापळकर म्हणाले, "शताब्दी वर्षानिमित्त संघाने 'कुटुंब प्रबोधन, सामाजिक समरसता, पर्यावरण संरक्षण, स्वबोध, स्वदेशी आणि नागरी कर्तव्ये' या पंचसूत्रीच्या माध्यमातून व्यापक जनजागृती सुरू केली आहे. समाजातील प्रत्येक घटकाने संघकार्य समजून घेऊन त्यात सहभागी व्हावे," असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमात पारंपरिक शस्त्रपूजन, शारीरिक प्रात्यक्षिके, घोषवादन, सांघिक गीत, अमृतवचन, व भारत मातेची प्रार्थना सादर करण्यात आली. उत्सवापूर्वी स्वयंसेवकांचे भव्य पथसंचलन कासारवाडी परिसरातून निघाले. या संचलनाचे नागरिकांनी फुलांची उधळण करून स्वागत केले. या उत्सवाला परिसरातील नागरिक, महिला, सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि विविध मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> "राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या माध्यमातून समाजात सुसंस्कारित, कर्तव्यदक्ष व राष्ट्रनिष्ठ व्यक्तिमत्त्व घडवले जात आहे. मलादेखील संघाच्या शाखेतून उत्तम मूल्य आणि जीवनदृष्टी लाभली. संघ शाखेत बौद्धिक व शारीरिक विकासासोबतच मूल्याधिष्ठित जीवनशैलीची शिकवण मिळते. हे संस्कार समाजात परिवर्तन घडवणारे ठरतात. संघाच्या सेवाकार्यामुळे देशभरात निस्वार्थ भावनेने कार्य करणारा मोठा कार्यकर्तावर्ग तयार झाला आहे."
>
> **–डॉ. निलेश भंडारी, वैद्यकीय चिकित्सक, कासारवाडी**

## दिघी गावठाण परिसरातील

# नागरिकांना वीज संकटातून दिलासा!

### भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**दिघी आणि परिसरातील नागरिकांना अनेक महिन्यांपासून त्रस्त करणाऱ्या वीज समस्यांवर अखेर कायमस्वरूपी तोडगा निघाला आहे. परिसरातील झपाट्याने वाढणारी वीजेची मागणी आणि जुनी झालेली वीज वितरण यंत्रणा यामुळे दररोज ४ ते ५ तास वीज खंडित होत होती. मात्र, आमदार महेश लांडगे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे ग्रेप्स उपकेंद्र (कळस) येथे १० MVA क्षमतेचे अतिरिक्त रोहित्र बसवण्यात आले असून, कळस उपकेंद्र ते दिघी गावठाण दरम्यान स्वतंत्र वीज वाहिनीचे कामही प्रगतीपथावर आहे.**

## 10 MVA क्षमतेचे नवीन रोहित्र आणि स्वतंत्र वीज वाहिनी कार्यान्वित

दिघी येथील गजानन महाराज नगर, पठारे कॉलनी, भारत माता नगर, बी.यु. भंडारी, आदर्शनगर, कमलराज सोसायटी, केशर किंगडम, परांडेनगर, माऊलीनगर या परिसरात रोज सकाळी ७ ते १० या वेळेत अतिभारीमुळे वीज पुरवठा खंडित होत होता. जुन्या यंत्रणांमुळे निर्माण होणारे बिघाड आणि त्यास पर्यायी व्यवस्था उपलब्ध नसल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते.

या समस्येवर कायमस्वरूपी उपाय म्हणून आमदार महेश लांडगे यांनी महावितरणच्या मुंबई कार्यालयाशी सतत संपर्क साधत ग्रेप्स उपकेंद्राची क्षमता १० MVA वरून २० MVA पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव मंजूर करून घेतला. त्यानंतर १० MVA क्षमतेचे नवीन रोहित्र कळस उपकेंद्रात पोहोचले असून, यामुळे आता वीज भाराच्या व्यवस्थापनात सक्षमपणा येणार आहे. शिवाय, दिघी परिसरासाठी स्वतंत्र वीज वाहिनीचे कामही सुरू असून, आगामी १५ दिवसांत सर्व काम पूर्ण होईल. त्यामुळे या भागातील नागरिकांना अखंडित व स्थिर वीज पुरवठा मिळणार आहे.

> "दिघी परिसरातील नागरिक गेल्या अनेक महिन्यांपासून वीज समस्यांचा सामना करत होते. ही समस्या फक्त तात्पुरत्या उपायांनी मिटणारी नव्हती, त्यामुळे कायमस्वरूपी तोडगा काढण्याचा निर्धार केला. कळस उपकेंद्राची क्षमता वाढवून आणि स्वतंत्र वीज वाहिनी टाकून आता दिघी परिसराला अखंड व स्थिर वीज पुरवठा होईल. महावितरण प्रशासनाने सर्व कार्यवाही प्राधान्याने पूर्ण करावी, अशी अपेक्षा आहे.
> **–महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**



